**गोपनीय**

**क्रमांक : का.स./बैठक/२७२**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : ३१.१०. २०२२

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी झालेल्या २७२व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सचिव,
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | अध्यक्ष |
| श्री. जयंत कुमार बांठिया<br>समर्थ अंगण, बिल्डींग-३A,<br>पु.ल.देशपांडे रोड, मिल्लत नगर,<br>अंधेरी –पश्चिम,<br>मुंबई – ४०० ०५३ | - | सदस्य |
| डॉ. शिरीष संख्ये<br>संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,<br>एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,<br>नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. | - | सदस्य |
| महानगर आयुक्त<br>मुं. म. प्र. वि. प्राधिकरण | - | सदस्य |
| प्रशासक<br>बृहन्मुंबई महानगरपालिका,<br>मुंबई - ४०० ००१. | - | सदस्य |
| अपर मुख्य सचिव,<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |

प्रधान सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

****

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २७२व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | **:** | **२१ ऑक्टोबर, २०२२ (शुक्रवार)** |
| **वेळ** | **:** | **दुपारी १२.०० वाजता** |
| **स्थळ** | **:** | **मा. मुख्य सचिव यांचे समिती कक्ष<br>६वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई – ४०० ०३२.<br>(प्रत्यक्ष व दूरचित्रसंवादाद्वारे)** |

**उपस्थित सदस्य:**

| | | |
|---|---|---|
| श्री. मनु कुमार श्रीवास्तव<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. एस. व्हि.आर. श्रीनिवास<br>महानगर आयुक्त<br>मुं. म. प्र. वि. प्राधिकरण | - | सदस्य |
| श्री. भूषण गगराणी<br>अपर मुख्य सचिव (१)<br>नगर विकास विभाग<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्रीमती वल्सा नायर<br>प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्या |

**निमंत्रित:**

श्री. मनोज सौनिक
अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

डॉ. के.एच.गोविंद राज
अतिरिक्त महानगर आयुक्त (२)
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

डॉ विजय सुर्यवंशी
अतिरिक्त महानगर आयुक्त (१)
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. प्रमोद आहुजा
संचालक (कामे),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. बसवराज एम. भद्रगोड
संचालक (प्रकल्प),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. सुनिल वांढेकर
प्रमुख अभियांत्रिकी,
अभियांत्रिकी विभाग

श्री. अंकुश नवले
वित्तीय सल्लागार
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. प्रकाश भांगरे
मुख्य अभियंता (अ.का.),
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्रीमती सु.भू. पेदे
सचिव, कार्यकारी समिती

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे स्वागत व अभिनंदन केले.

श्री. हर्षदीप कांबळे, प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, उर्जा व कामगार विभाग आणि श्री. प्रवीण दराडे, सचिव, पर्यावरण विभाग यांचे "**पदसिध्द निमंत्रित**" म्हणून स्वागत व अभिनंदन केले.

श्री. बलदेव सिंग, तत्कालीन अपर मुख्य सचिव (उद्योग), उद्योग, उर्जा व कामगार विभाग आणि श्रीमती मनिषा म्हैसकर, तत्कालीन प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी **'पदसिध्द निमंत्रित'** म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २९ जुलै, २०२२ रोजी झालेल्या २७१व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**<u>बाब क्र.२ :</u>** **<u>प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २९ जुलै २०२२ रोजी झालेल्या २७१व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.</u>**

कार्यकारी समितीने कार्यवाही अहवालाची नोंद घेतली.

**<u>बाब क्र. ३:</u>** **<u>मुंबई मेट्रो मार्गिका डी.एन. नगर ते मंडाले (लाईन २ब) आणि अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व) (लाईन-७) साठी रोलिंग स्टॉक, संकेत आणि दूरसंचार खरेदी, अंमलबजावणी आणि कार्यान्वित करण्यासाठी दिनांक १९.०१.२०१७ रोजी करण्यात आलेल्या कराराचा कालावधी आणि सल्लागार शुल्काची मुदतवाढ.</u>**

३.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी अशी माहिती दिली की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (दि.मे.रे.कॉ) यांच्यात दिनांक १९.०१.२०१७ रोजी वरील काम ०४.०८.२०१६ पासून ४ वर्षांत अंमलात आणण्यासाठी करार करण्यात आला. दि.मे.रे.कॉ. ची फी.रु.३४०.१४ कोटी (एकूण प्रकल्प खर्च ₹ ५६६९/- कोटीच्या ६%) अधिक कर आहे. दरम्यान, प्रकल्प पूर्ण होण्याचा कालावधी २ वर्षांसाठी म्हणजे ऑगस्ट, २०२२ पर्यंत त्याच सल्लागार शुल्कासह २ वर्षांनी वाढविण्यात आला. मेट्रो मार्गिका २ब तसेच मंडाले आगाराच्या कामांची प्रगती संथगतीने असल्याने तसेच, कोरोनासारख्या महाभयंकर साथीच्या रोगामुळे आणि परदेशातील प्रवास व उपकरणे/प्रणालींच्या वाहतुकीवरील निर्बंध, यामुळे ट्रेन बोगीच्या निर्मितीच्या कामावर परिणाम झाला आणि बीईएमएल द्वारे ट्रेन संचाच्या पुरवठ्यास बराच विलंब झाला. त्यामुळे जुलै, २०२२ पर्यंत सर्व ट्रेन संचाचा पुरवठा आणि कार्यान्वयन सुनिश्चित करणे दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनला शक्य होणार नाही. मेट्रो लाईन २ब साठी सामान्य सल्लागार यांचा रोलिंगस्टॉक व संकेत व दूरसंचार कामासाठीचा मे. AICA चा करार आधीच २ वर्षांनी जून २०२२ पर्यंत वाढविण्यात आला आहे.

३.२ चर्चेस अनुसुरुन असे नमुद केले की, दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांचेशी असलेला विद्यमान करार, कलम १० नुसार रु.७९.३६६०८ कोटी अतिरिक्त शुल्कासह पुढील २ वर्षांच्या कालावधीसाठी म्हणजेच ऑगस्ट, २०२४ पर्यंतचा विस्ताराचा प्रस्ताव स्विकारण्याची शिफारस केली.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्र.१४३१ :</u>**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांचेशी असलेला विद्यमान करार कलम १० नुसार २ वर्षांच्या कालावधीसाठी म्हणजेच ऑगस्ट, २०२४ पर्यंतचा विस्ताराचा अनुषंगाने ₹ ७९.३६६०८ कोटी अतिरिक्त शुल्क मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या निधीमधून देण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि. प्राधिकरण यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र. ४</u> : <u>विस्तारीत मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत ठाणे बेलापूर रस्ता ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ पर्यंतचा रस्ता व बोगदयाच्या सुधारित काम व त्याअनुषंगाने रक्कमेतील झालेल्या वाढीस मान्यता मिळण्याबाबत</u>**

४.१ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत रस्त्यांची बांधकामे व रुंदीकरण तसेच पुलांची कामे हाती घेण्याचे ठरले. यामध्ये ऐरोली ते कटाई नाका या एकूण १२.३ कि.मी. लांबीच्या प्रकल्पाचा अंतर्भाव होता. प्राधिकरणाच्या दिनांक २७/०६/२०१४ रोजी झालेल्या १३४ व्या बैठकीत सदर प्रकल्पासाठी एकूण ₹ ९४४.२० कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सदर प्रकल्पाच्या एकूण १२.३ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे विकसन योग्य प्रकारे होण्याच्या दृष्टीने प्रकल्प तीन भागात विभागण्यात आला असून त्यातील भाग क्र. १, ठाणे बेलापूर रस्ता ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ असा एकूण ३.५० कि.मी. लांबीचा आहे. सदर भाग-१ मधील उन्नत मार्गाच्या एकूण रॅम्पसहित २३९२ मीटर लांबी असलेल्या व ₹ १४४,४७,००,०००/- किंमतीच्या लघुत्तम दराच्या निविदेस

..५/-

कार्यकारी समितीची मान्यता प्राप्त झाल्यानंतर कार्यारंभाचे आदेश देण्यात आले आहेत. समांतररित्या, भाग -१ मधील ठाणे बेलापूर रस्ता ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ पर्यंतचा रस्ता व बोगदयाच्या कामासाठी मे. आय व्ही आर सी एल व एस एम सी इन्फ्रास्टक्चर प्रा. लि. (जेव्ही) यांच्या रु. २३७,५५,५१,७८७.२७/- (रुपये दोनशे सदतीस कोटी पंचावन्न लाख एकावन्न हजार सातशे सत्याऐंशी आणि सत्तावीस पैसे फक्त) इतक्या किंमतीच्या लघुत्तम निविदेस प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने दि. ०३/०३/२०१८ रोजी झालेल्या २५७व्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

४.३ चर्चे दरम्यान असे नमुद केले की, सदर कामासाठी कंत्राटदारास दिनांक ०४ मे, २०१८ रोजी कार्यारंभाचे आदेश देण्यात आले. बांधकामाचा कालावधी ४० महिने इतका होता. उपरोक्त कालावधीमध्ये प्रकल्पाचे काम पूर्ण न झाल्यामुळे कंत्राटदारास दिनांक ३१/१२/२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. सद्य:स्थितीत ६६% काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित काम प्रगतीपथावर असून विलंबाची कारणे खालील प्रमाणे आहेत:

- भाग-१ अंतर्गत बोगदा व रस्ता या कामासाठी शासनाच्या वन विभागाकडून सदर जागेवर काम करणेकरीता ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबतचा प्रस्ताव निविदाप्रक्रियेपूर्वीच सादर करण्यात आला होता. सदर प्रकल्पाच्या बाधित वनक्षेत्राएवढे क्षेत्र, जे वन विभागास मान्य होते ते महसूल विभागामार्फत अमान्य करण्यात आले. या बाबींमुळे वन विभागातर्फे काम करण्याकरीता 'ना-हरकत' हे ब-याच विलंबाने म्हणजे दिनांक २६ नोव्हेंबर, २०१८ रोजी प्राप्त झाले. तद्नंतरच बोगदयाच्या प्रत्यक्ष कामास प्रारंभ करणे शक्य झाले. काम सुरु केल्यानंतर खालीलप्रमाणे अडचणी उद्भवल्या.

  अ) कोव्हीड-१९ हया जागतिक महामारीमुळे तसेच टाळेबंदीमुळे प्रकल्पांच्या कामांच्या प्रगतीवर परिणाम झाला.

  ब) उच्च दाबाच्या विद्युत लाईन्सचे स्थलांतरण /उंची वाढविणे आवश्यक होते.

  क) बोगदयाच्या ऐरोली बाजूकडून सुमारे ३०० मी. अंतरावरील बोगदयावर फक्त २.१ मी. ओव्हरबर्डन आहे. सदर ठिकाणी बोगदयाचे खोदकाम करताना बोगदयामधील अंदाजे ५० मी. इतक्या लांबीत माती कोसळण्याची शक्यता होती असे विस्तृत

प्रकल्प अहवालात नमूद होते. परंतु प्रत्यक्षात अंदाजे २०० मी. पेक्षा जास्त पर्यंतच्या लांबीत माती कोसळण्याची परिस्थिती निर्माण झाली. यास्तव सदर भागात बोगदयावरील या भागाच्या लांबीतील माती/ भराव काढणे आवश्यक ठरले. तसेच ही माती काढल्यानंतर त्याठिकाणी बोगदयाचा उघड्या भागाचे संरक्षण करणे व त्या दृष्टीने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारातर्फे वेगवेगळे चार (४) पर्याय प्राधिकरणास सादर करण्यात आले. या चार पर्यायांपैकी सुरक्षा, बांधकामाचा कालावधी व किंमत या बाबींचा सर्वकष विचार करता एका पर्यायाची शिफारस प्रकल्प सल्लागाराने केली.

ड) सदर बोगदयाचे काम हे नियंत्रित ब्लास्टींगव्दारे करण्यात येत असून ब्लास्ट घेतल्यानंतर बोगदयाच्या परिघालगत मोठया प्रमाणात फ्रॅक्चरर्ड दगड आढळून आले. सदर बोगदयाचे मजबुतीकरण ३२ मिमी व्यासाच्या रॉक बोल्ट व्दारे करण्यात येत आहे.

या अडचणींच्या अनुषंगाने आवश्यक ठरणा-या वाढीव कामांच्या खर्चाचा गोषवारा खालीलप्रमाणे:

| **अ.क्र.** | **विवरण** | **रक्कम (रु. कोटीत)** |
|---|---|---|
| १ | डोंगर दरीमधील (Valley portion) खोदकाम व मजबुतीकरण करणे. | १११.८८ |
| २ | बोगदयाच्या कामाअंतर्गत सुरक्षिततेच्या दृष्टीने ३२ मी.मी रॉक बोल्ट बसविणे. | ३१.९८ |
| ३ | प्रकल्पासाठी वाढीव वस्तु व सेवा कर (GST) | ६.५९ |
| | **एकूण वाढीव रक्कम ₹** | **१५०.४५** |

वरील सर्व बाबींचा विचार करता, सदर कंत्राटामध्ये एकूण रु. १५०.४५ कोटी (कंत्राटीय रक्कम रु. २३७.५५ कोटी च्या ६३.३३%) वाढ झालेली आहे.

४.४ चर्चेस अनुसरुन असे नमुद केले की, ऐरोली - कटाई नाका महामार्ग प्रकल्प या कामासाठी दिनांक २७ जून, २०१४ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १३४ व्या बैठकीत ₹ ९४४.२० कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती. त्यापैकी भाग १, २ या कामाकरीता व अपेक्षित विविध

वाहिन्यांच्या स्थानांतरणासाठी ₹ ७१७.३६ कोटी इतक्या सुधारीत रक्कमेस मंजूरी प्रदान करण्यात आली होती. सदर प्रकल्पातील भाग १, २ व अपेक्षित विविध सेवावाहिन्यांच्या स्थानांतरणासाठी सुधारित रक्कम रु. १४९४.८७ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करणे बाबतचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या १५३ व्या बैठकीत सादर करण्यात आला आहे. उपरोक्त प्रस्तावामध्ये वन विभाग, नवी मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका यांना प्रकल्पासाठी विविध बाबींवर शुल्क अदा करणे, प्रकल्प व्यवस्थापनासाठी वाढीव शुल्क तसेच बोगदा व रस्ता प्रकल्पाच्या मुंब्रा येथील उजव्या बाजूचा डोंगरकडयाचे संर्वधन करणे, इ. बाबींचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

४.५ सदर बोगदयाच्या कामातंर्गत डोंगरदरी मधील मजबूतीकरणाचे काम सद्य:स्थितीत असलेल्या कंत्राटदाराकडून का करुन घेण्यात येत आहे, अशी मा. मुख्य सचिव व अध्यक्ष कार्यकारी समिती यांनी विचारणा केली. सदर बाबत महानगर आयुक्त यांनी असे विषद केले की, सदर कामाचा वाव हा बोगदयाच्या कामामध्येच असल्यामुळे सदर काम हे कामाच्या कंत्राटदाराकडून करुन घेण्यात येत आहे. सदर बाबत मा. मुख्य सचिव व अध्यक्ष कार्यकारी समिती यांनी सहमती दर्शविली.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४३२:**

“**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधियिम १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे ठाणे बेलापूर मार्ग ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ पर्यंतचा रस्ता व बोगदयाच्या प्रस्तावित सुधारित काम व त्याअनुषंगाने ₹ १५०.४५ कोटी (रुपये एकशे पन्नास कोटी पंचेचाळीस लाख) इतकी वाढीव रक्कम स्विकारण्यास व त्याअनुषंगाने करण्यात येणा-या अटीप्रमाणे देय होणारी भाववाढ, इ. अधिदान करण्यास मान्यता देत आहे.”

“**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**बाब क्र. ५: विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत ऐरोली पुल ते ठाणे – बेलापूर रस्ता दरम्यानच्या उन्नत रस्त्याच्या संकल्पचित्र व बांधकाम (Design Built) तत्वावर ठोक रक्कम पध्दतीवर बांधकाम करणे – सुधारित काम व त्याअनुषंगाने रक्कमेतील झालेल्या वाढीस मान्यता मिळणेबाबत**

५.१ महानगर आयुक्त यांनी असे विषद केले की, मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत रस्त्यांची बांधकामे व रुंदीकरण तसेच पुलांची कामे हाती घेण्याचे ठरले व त्यात ऐरोली कटाई नाका या एकूण १२.३ कि.मी. लांबीच्या प्रकल्पाचा अंतर्भाव असून प्राधिकरणाच्या दिनांक २७/०६/२०१४ रोजी झालेल्या १३४ व्या बैठकीत सदर प्रकल्पासाठी एकूण रु. ९४४.२० कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाच्या एकूण १२.३ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे विकसन योग्य प्रकारे होण्याच्या दृष्टीने आखणी मार्ग तीन भागात विभागण्यात आला असून त्यातील भाग – २, मुलूंड -ऐरोली पुल ते ठाणे बेलापूर रस्ता असा एकूण २.५७ कि.मी. लांबीचा आहे. सदर भाग-२ मधील उन्नत मार्गाच्या एकूण रॅम्पसहित २५७० मीटर लांबी असलेल्या व ₹ २७५,९०,००,०००/- किंमतीच्या लघुत्तम दराच्या निविदेस कार्यकारी समितीच्या दिनांक ०५/०९/२०१८ रोजी झालेल्या २५९व्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

५.२ चर्चे दरम्यान असे नमुद केले की, सदर कामासाठी कंत्राटदारास दिनांक २८/११/२०१८ रोजी कार्यारंभाचे आदेश देण्यात आले. बांधकामाचा कालावधी ३० महिने इतका होता, उपरोक्त कालावधीमध्ये प्रकल्पाचे काम पूर्ण न झाल्याने कंत्राटदारास दिनांक ३१/१२/२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सद्य:स्थितीत ५६.५०% इतके काम पूर्ण करण्यात आलेले आहे. उर्वरित काम प्रगतीपथावर असून विलंबाची कारणे खालीलप्रमाणे आहेत: -

- भाग -२ मधील उन्नत मार्गाकरीता वन तसेच पर्यावरण विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र हे ब-याच विलंबाने दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी प्राप्त, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (CIDCO) यांचेकडून जमिन अधिग्रहण केल्यानंतर प्रत्यक्ष कामास प्रारंभ करणे शक्य झाले. काम सुरु केल्यानंतर खालील अडचणी उद्भवल्या.

  आ)कोव्हीड-१९ ह्या जागतिक महामारीमुळे तसेच टाळेबंदीमुळे प्रकल्पांच्या कामांच्या प्रगतीवर परिणाम झाला.

ब) रेल्वे विभागाचे ना-हरकत पत्र तसेच रेल्वे विभागाचे सबस्टेशनचे स्थानांतरण करणे.

क) उच्च दाबाच्या विद्युत वाहिन्यांचे स्थानांतरण / उंची वाढविणे- प्रकल्पांतर्गत पटणी रोड जवळ २२ केव्हीच्या व ४०० केव्हीच्या उच्च दाबाच्या विद्युत वाहिन्या तसेच श्रीराम शाळेजवळ असलेल्या ४०० केव्हीच्या दोन उच्च दाबाच्या विद्युत वाहिन्या प्रत्यक्ष आखणी मार्गाने बाधित होत आहेत. सदर उच्च दाबाच्या विद्युत वाहिन्यांचे स्थानांतरण व उंची वाढविणे आवश्यक आहे. सदर काम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेमार्फत उपरोक्त वाहिन्यांचे स्थलांतरणासाठी होत असलेल्या विलंबामुळे, प्राधिकरणाने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून अंदाजपत्रक (SOR – २०१८) तयार करुन सदरचे काम हे त्यांच्या देखरेखीखाली प्रकल्पाच्या कंत्राटदारामार्फत विहित मुदतीत पूर्ण करण्याचे प्रयोजन आहे.

ड) उपरोक्त प्रकल्पाने बाधित विविध सेवावाहिन्या जसे मल:निसारणाची वाहिनी, पिण्याच्या पाण्याची ९०० मिमी व ६०० मिमी व्यासाची वाहिनी, पर्जन्य जलवाहिन्या इ. चे स्थानांतरण करणे आवश्यक आहे.

इ) सदर प्रकल्प हा रेल्वे लाईन (ट्रान्स हार्बर) वरुन जात असल्याने रेल्वे विभागाच्या अभिप्रायानुसार त्या भागातील पुलाचे काम स्टेनलेस स्टीलचा वापर करण्याबाबत कळविले.

ई) विस्तृत प्रकल्प अहवाल व प्रत्यक्ष काम करतेवेळी भूगर्भीय पातळीच्या तफावतीमुळे फाऊंडेशन व पीअरमध्ये अंशत: बदल करणे आवश्यक ठरले.

उ) सदर कामाच्या उन्नत मार्गाचा पृष्ठभाग हा मास्टीकव्दारे डांबरीकरण करणे रस्त्याच्या देखभाल व दुरुस्तीच्या दृष्टीकोनातून करणे आवश्यक आहे.

ऊ) सदर प्रकल्पासाठी आवश्यक भाववाढ, वाढीव वस्तू व सेवा कर इ. चा समावेश करण्यात आलेला आहे.

या अडचणींच्या अनुषंगाने आवश्यक ठरणा-या वाढीव कामांच्या खर्चाचा गोषवारा खालीलप्रमाणे:

| **अ.क्र.** | **विवरण** | **रक्कम (रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| १ | उच्च दाबाच्या विद्युत वाहिन्यांचे स्थलांतर/ उंची वाढविणे. | ५९.१३ |
| २ | प्रकल्पाने बाधित विविध सेवा वाहिण्यांचे स्थलांतर करणे. | १५.३१ |
| ३ | रेल्वेवरील पुलासाठी स्टेनलेस स्टीलचा वापर | ३.५० |
| ४ | फाऊंडेशन आणि पीअर वाढीव शुल्क, इ. | २६.०० |
| ५ | मास्टीकव्दारा रस्त्याचे काम | ४.०० |
| ६ | प्रकल्पासाठी वाढीव वस्तु व सेवा कर (GST) | १०.७० |
| | **एकूण वाढीव रक्कम ₹** | **११८.६४** |

वरील सर्व बाबींचा विचार करता, सदर कंत्राटामध्ये एकूण ₹ ११८.६४ कोटी (कंत्राटीय रक्कम ₹ २७५.९० कोटी च्या ४३.००%) वाढ झालेली आहे.

५.४ चर्चेनंतर असे नमुद केले की, ऐरोली – कटाई नाका महामार्ग प्रकल्प या कामासाठी २७ जून, २०१४ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १३४ व्या बैठकीत ₹ ९४४.२० कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यापैकी भाग १, २ या कामाकरीता व अपेक्षित विविध वाहिन्यांच्या स्थानांतरणासाठी ₹ ७१७.३६ कोटी इतक्या रक्कमेस मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पातील भाग १, २ व अपेक्षित विविध सेवावाहिन्यांच्या स्थानांतरणासाठी सुधारित रक्कम रु. १४९४.८७ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या १५३ व्या बैठकीत सादर करण्यात आलेला आहे. उपरोक्त प्रस्तावामध्ये प्रकल्प व्यवस्थापनासाठीचे वाढीव शुल्क, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, सिडको यांच्या प्रकल्पासाठी लागणा-या जमिनीने भूसंपादनाकरीता अदा करावयाची रक्कम, वन विभाग, नवी मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका/ मध्य रेल्वे यांना प्रकल्पासाठी विविध बाबींवर शुल्क अदा करणे, इ. बाबींचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

..११/-

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १४३३:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे मुलूंड- ऐरोली पुल ते ठाणे - बेलापूर रस्ता दरम्यानच्या प्रस्तावित सुधारित काम व त्याअनुषंगाने रु. ११८.६४ कोटी (रुपये एकशे अठरा कोटी चौसष्ट लाख फक्त) इतकी वाढीव रक्कम स्विकारण्यास व त्याअनुषंगाने करण्यात येणा-या अटीप्रमाणे देय होणारी भाववाढ, इ. अधिदान करण्यास मान्यता देत आहे. "

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ६: विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील नव्याने मंजूर झालेल्या पॅकेज १ ते ५ कामांसाठी कंत्राटदार नेमणुकीकरिता मान्यता मिळणेबाबत**

६.१ महानगर आयुक्तांनी या प्रस्तावाविषयी माहिती देतांना असे सांगितले की, तत्कालीन मा. मंत्री नगरविकास तथा अध्यक्ष प्राधिकरण यांनी विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) योजनेअंतर्गत कल्याण डोंबिवली महानगरपालिका (KDMC) क्षेत्रातील एकूण ४० रस्त्यांच्या कामांसाठी दि. २७.०४.२०२१ रोजी ₹ ४८७.५२ कोटी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

६.२ तथापि, प्राधान्याच्या अनुषंगाने प्राधिकरणामार्फत विस्तारित मुंबई नागरी सुविधा प्रकल्पांतर्गत (Extnd. MUIP) एकूण मान्यताप्राप्त झालेल्या ३१ रस्त्यांची कामे ₹ ३६०.६४ कोटीची हाती घेण्यात आली आहेत. यापैकी ₹ ५ कोटी पेक्षा अधिक किंमतीची एकूण ₹ ३३२.०५ कोटीची २४ कामे प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत आहेत. तसेच या यादीतील ₹ ५ कोटी पेक्षा कमी किंमतीची ज्याची अंदाजित रक्कम ₹ २८.५९ कोटी आहे अशी एकूण ७ कामे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमार्फत हाती घेण्याचे प्रस्तावित आहे. ही सर्व कामे शासनाच्या प्रचलित नियमानुसार हाती घेण्यात येत आहेत.

६.३ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत (Extd. MUIP) दिनांक १४.११.२०२१ रोजी महानगर आयुक्त यांच्या मान्यतेनुसार, प्रभागातील कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्याशी समन्वय साधून कामे विहीत मुदतीत करण्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या प्रभागाच्या हद्दीनुसार ५ भागात विभाजित करण्यात आली आहेत. सल्लागाराच्या या पाचही भागांची कंत्राटदार नेमणूकीसाठी स्वतंत्र ई – निविदा टाइम्स ऑफ इंडिया आणि सामना या वर्तमानपत्रामध्ये दि. २६ जुलै २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

६.४ सर्व पाचही भागांकरीता सल्लागारांना कार्यादेश देण्यात आले असून भाग- १ ते ५ करीता सविस्तर प्रकल्प अहवाल प्राधिकरणास सादर करण्यात आला आहे. सदरील रस्त्याचे अंदाजपत्रक हे गतवर्षाच्या म्हणजे २१-२२(DSR/SSR) मधील दर सुचीनुसार तयार करण्यात आले आहेत. कामांचा व सल्लागारांचा तपशिल खालीलप्रमाणे:

| **अ.क्र** | **कामाचे नाव** | **लांबी** (मी) | **सुधारीत अंदाजित खर्च (रु.कोटीत)** |
|---|---|---|---|
| **भाग -१** | | | |
| **प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची - मे. माहिमतुरा कन्सल्टंटस प्रा.लि.** | | | |
| १. | डोंबिवली पूर्व गजाजन चौक ते(नांदिवली) नाला पर्यत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ११०० | १९.०६ |
| २. | शिळ रस्ता ते संदप उसरघर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २१०० | १७.०८ |
| ३. | डोंबिवली पूर्व मानपाडा रस्ता (स्टार कॉलनी ते समर्थ चौक रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ९५० | १७.६ |
| ४. | उंबार्ली पाईपलाईन ते उंबार्ली स्मशानभूमीपर्यंत रस्ता तयार करणे. | २८५० | २४.१६ |
| | **एकूण** | | **७७.४४** |
| **भाग -२** | | | |
| **प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार- मे. पेन्टॅकल कन्सलटंट इंडिया प्रा. लि.** | | | |
| ५. | डोंबिवली पूर्व संत नामदेव पथ- पाथर्ली क्रॉस रोड ते मानपाडा रोड पर्यत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ६०० | ८.१५ |
| ६. | डोंबिवली पूर्व टिळक पुतळा ते टंडन रामनगर पोस्ट ऑफिस पर्यत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ११०० | १६.८६ |
| ७. | डोंबिवली पूर्व नेरुरकर रोड सिटीआर्च बिल्डींग ते स्वामी विवेकानंद शाळा पर्यंत रस्ता क्रॉक्रीटीकरण करणे. | ७०० | ११.६७ |
| ८. | डोंबिवली पूर्व दत्त नगर चौक ते अशोक वाटिका पर्यत रस्ता तयार करणे. | १०००. | १६.५७ |
| ९. | डोंबिवली पूर्व शिवमंदिर रोड –केळकर रोड मे संगीतावाडी पर्यत रस्ता सी.सी.करणे. | ५५० | ७.०५ |
| | **एकूण** | | **६०.३१** |

| | | | |
|---|---|---|---|
| **भाग -३** | | | |
| **प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार: मे. माहिमतुरा कन्सल्टंटस प्रा.लि.** | | | |
| १०. | डोंबिवली पश्चिम जुनी डोंबिवली रोड/जोंधळे शाळा ते जुनी डोंबिवली रेल्वेफाटक पर्यंत सी.सी. रस्ता करणे. | १५०० | १३.३८ |
| ११. | डोंबिवली पश्चिम मोठागाव ते कोपर रोड (डीपी) रेल्वे समांतर रस्ता करणे. | प्रस्तावित नविन रस्ता २३०० | १२.७७ |
| १२. | कल्याण पूर्व आंबेडकर चौक ते जगदीश दुग्धालय पर्यंत रस्ता करणे. | ६०० | ८.८७ |
| १३. | कल्याण पूर्व क्रिस्टल प्लॉझा ते गोदावरी बिल्डींग (लोकग्राम) पर्यंत रस्ता करणे | ५४० | १०.६४ |
| १४. | कल्याण पूर्व विठ्ठलवाडी स्टेशन ते सूर्या शाळेपर्यंत रस्ता तयार करणे. | ६०० | ७ |
| | **एकूण** | | **५९.७७** |
| **भाग -४** | | | |
| **प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार: मे. कम्पोझिट कंबाईन टेक्नोक्रॅट्स प्रा.लि.** | | | |
| १५. | कल्याण पूर्व काटेमानिवली चौक ते खडेगोळवली पर्यंत रस्ता करणे. | १५०० | १६.१४ |
| १६. | कल्याण पूर्व – ड प्रभाग अंतर्गत तिसाई मंदिर ते १०० फुट रोड पर्यंत पोहोच रस्ता करणे. | प्रस्तावित नविन रस्ता | ७.९७ |
| १७. | कल्याण पूर्व चिंचपाडा कमान ते डी.एस.एम. शाळेपर्यंत रस्ता तयार करणे. | ११०० | १०.४० |
| १८. | कल्याण पूर्व (मलंगगड रोड – आरटीओ ऑफिस) ते म्हसोबा चौक ते माणेरे कमान पर्यंत रस्ता करणे. | २८०० | १८.६५ |
| १९. | कल्याण पूर्व आकाश कॉलनी ते वसार मुख्य रस्ता एमआयडीसी पाईपलाईन पर्यंत रस्ता तयार करणे. | १५०० | ९.२० |
| | **एकूण** | | **६२.३८** |
| **भाग – ५** | | | |
| **प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार: मे. पेन्टॅकल कन्सलटंट इंडिया प्रा. लि.** | | | |
| २०. | आडीवली मलंगगड रोड ते आडीवली तलाव पर्यंत रस्ता तयार करणे. | १४०० | १९.१८ |
| २१. | उल्हासनगर ४ व्हीनस चौक ते एस.एस.टी. कॉलेज – मोरया नगरी ते नागकन्या मंदिर –विटीसी ग्राउंड ते श्रीराम चौक पर्यंत रस्ता सी.सी.करणे. | ९०० | १६.७७ |
| २२. | कल्याण पश्चिम रोड सॅमसंग गॅलरी ते फोर्टीझ हॉस्पिटल ते वल्लीपीर रोड पर्यंत रस्ता सी.सी. करणे. | ३५० | ६.०९ |
| २३. | कल्याण पश्चिम वल्लीपीर रोड ते जी.के.चौक ते चिराग हॉटेल गोविंदवाडी रोड पर्यंत रस्ता तयार करणे. | १०४० | १३.४५ |
| २४. | कल्याण पश्चिम मांडा पश्चिम, रेल्वे फाटक, बाजारपेठ व वासुनद्रीकडे जाणारा रस्ता सी.सी.करणे. | १५०० | १७.४५ |
| | **एकूण** | | **७२.९४** |
| | **एकूण( १+२+३+४+५)** | | **३३२.८४** |

६.५.  सदर प्रकल्पातील रस्ते कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील आहेत, या प्रकल्पातर्गत एकूण २४ रस्ते असून विकास आराखड्याप्रमाणे ९ मी., १२मी., १५ मी., १८ मी. आणि २४मी. च्या विविध रुंदीचे आहेत, हे रस्ते डोंबिवली विभागातील गजबजलेल्या भागात वसलेले आहेत, त्यामुळे या शहरातील रस्ते सुधारणे आणि रुंद करणे आवश्यक आहे. या रस्त्याच्या विकासाचे काम प्राधिकरणामार्फत केले जाणार आहेत. सध्य स्थितीत या डांबरी रस्त्यांचे पृष्ठभाग खराब झालेले आहेत.

६.६  सदरच्या कामांमध्ये सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या दोन्ही बाजूला पर्जन्य जलवाहिन्या (Storm Water Drain), फुटपाथ, डांबराचा शोल्डर, सिमेंट काँक्रीट रस्त्याचे बांधकाम प्रस्तावित करण्यात आले आहे. पदपथचा समावेश असेल. साइड स्ट्रिप मध्ये सेवावाहिन्यांसाठी सोय करण्यात आली आहे.

६.७  महानगर आयुक्तांनी प्रस्तावाविषयी माहिती देताना असे सांगितले की, कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या बांधकामाच्या कामासाठी कंत्राटदार नेमण्यासाठी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. ई-निविदा सूचना २६/०७/२०२२ रोजी वृत्तपत्रांमध्ये आणि प्राधिकरणाच्या वेबसाइटवर दि. २६/०७/२०२२ रोजी खालीलप्रमाणे प्रकाशित करण्यात आल्या.

| **भाग** | बांधकाम खर्च (₹) | **प्रोव्हीजीनल सम (₹)** | **रॉयल्टी (₹)** | अंदाजे किंमत (₹) |
|---|---|---|---|---|
| १ | ६३,४२,४८,०९४.०० | ५,५३,५७,१४२ | २१,१७,९५४ | ६९,१७,२३,१९० |
| २ | ४७,३५,८३,२६१.०० | ४,७७,७५,३७४ | ४१,७०,४७६ | ५२,५५,२९,१११ |
| ३ | ४७,०२,१९,८९२.०० | ५,०३,८०,७०४ | १,४५,८५,०७५ | ५२,०६,००,५९६ |
| ४ | ४९,६८,२०,९२७.०० | ३,०८,५१,४१० | ८७,३९,९५६ | ५३,६४,१२,२९३ |
| ५ | ५७,८९,४७,५०४.०० | ५,८२,६५,४४१ | ३७,०६,९०९.५२ | ६३,७२,१२,९४५ |

६.८  दि.०५.०८.२०२२ रोजी निविदापुर्व बैठक नियोजित होती. सदर निविदा पुर्व बैठकीत १९ इच्छुक निविदाकार उपस्थित होते. सदर बैठकीत उपस्थित करण्यात आलेले मुद्दे व लेखी स्वरुपात प्राप्त झालेले मुद्दे अशा सर्व मुद्यांचे एकत्रितपणे निराकरण करुन स्पष्टीकरणाचा सामान्य संच (Common set of clarification) व सामान्य संच विचलन (Common set of Deviation) प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आले.

६.९ भाग -१,२,३,४ व ५ याकरीता ई-निविदा स्विकारण्याची अंतिम दिनांक खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | भाग | स्विकारण्याची अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १ | भाग -१ | १३.०९.२०२२ |
| २ | भाग -२ | १४.०९.२०२२ |
| ३ | भाग -३ | २०.०९.२०२२ |
| ४ | भाग -४ | २१.०९.२०२२ |
| ५ | भाग -५ | २८.०९.२०२२ |

६.१० भाग -१,२,३,४ व ५ करीता खालीलप्रमाणे निविदाकारांनी निविदा सादर केलेल्या आहेत.

भाग- १

| अ.क्र. | निविदाकार |
|---|---|
| १. | मे.एन.ए.कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. |
| २. | मे. अश्विनी इन्फ्राडेव्हलपमेंट प्रा. लि |
| ३. | मे. आरपीएस इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि |

भाग- २:

| अ.क्र. | निविदाकार |
|---|---|
| १. | मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि |
| २. | मे. जयहिंद रोड बिल्डर्स |
| ३. | मे. अश्विनी इन्फ्राडेव्हलपमेंट प्रा. लि |
| ४. | मे. आरपीएस इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि |
| ५. | मे. आर.के मदानी अँन्ड कंपनी |
| ६. | मे.एन.ए.कंन्स्ट्रक्शन प्रा.लि |

भाग — ३

| अ.क्र. | निविदाकार |
|---|---|
| १. | मे. बिटकॉन इंडिया इन्फ्रास्टक्चर डेव्हलपर्स प्रा. लि |
| २. | मे. जयहिंद रोड बिल्डर्स |
| ३. | मे.एन.ए.कंन्स्ट्रक्शन प्रा.लि |
| ४. | मे. आर इ इन्फ्रा प्रा. लि |

भाग — ४

| अ.क्र. | निविदाकार |
|---|---|
| १. | मे.जी.एल कन्स्ट्रक्शन प्रा.लि. |
| २. | मे. इगल इन्फ्रा इंडिया लि. |
| ३. | मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि |
| ४ | मे. आर इ इन्फ्रा प्रा. लि |
| ५. | मे. आर.के मदानी अँन्ड कंपनी |
| ६. | मे. बिटकॉन इंडिया इन्फ्रास्टक्चर डेव्हलपर्स प्रा. लि |

भाग- ५

| अ.क्र. | निविदाकार |
|---|---|
| १. | मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि |
| २. | मे. अश्विनी इन्फ्राडेव्हलपमेंट प्रा. लि |
| ३. | मे. इगल इन्फ्रा इंडिया लि. |
| ४. | मे. वित्राग इन्फ्रा प्रोजेक्ट्स एलएलपी |
| ५. | मे. आरई इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड |
| ६. | मे. अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड |

६.८ संबंधित सल्लागारद्वारे तांत्रिक मूल्यमापन अहवाल प्राधिकरणाने गठीत केलेल्या निविदा शिफारस समितीसमोर (Tender Recommendation Committee) सादर करण्यात आले तसेच निविदेतील नमुद केलेल्या अटीनुसार (एक कंत्राटदारास एकच काम) समितीने सहमती दर्शविल्यानंतर निविदाकारांचे आर्थिक देकार (Financial offers) उघडण्यात आले व संबंधित लघुत्तम निविदाकाराकडून स्पष्टीकरण मागविण्यात आले. प्राधिकरणाने स्थापन केलेल्या निविदा शिफारस समितीने (Tender Reommendation Committee) सल्लागाराच्या सहाय्याने निविदेतील निकषांच्या आधारे निविदाकारांच्या आर्थिक देकारांची केलेली छाननी खालीलप्रमाणे:-

| भाग | निविदाकार | प्रथम देकार (वस्तु व सेवा कर+प्रोव्हीजीनल सम+रॉयल्टी वगळुन) | टक्केवारी | वाटाघाटी नंतरचे देकार (₹) (वस्तु व सेवा कर+प्रोव्हीजीनल सम+रॉयल्टी वगळून) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. अश्विनी इन्फ्राडेव्हलपमेंट प्रा. लि | ७१,९१,१५,४२८.३२ | +३.९६% | ६३,४२,४८,०९४ | निविदा रक्कमेचा दर |
| २ | मे. आरपीएस इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि | ४९,२७,६३,३८३.०७ | +४.०५% | ४७,३५,८३,२६१.०० | निविदा रक्कमेचा दर |
| ३ | मे. बिटकॉन इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स प्रा. लि | ४६,५७,५२,८०३.०३ | -०.९५% | ४६,५७,५२,८०३.०३ | -०.९५% |
| ४ | मे. ईगल इन्फ्रा इंडिया लि . | ५०,१२,९२,३१५ | +०.९० | ४९,६८,२०,९२७.०० | निविदा रक्कमेचा दर |
| ५ | मे. आरई इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड | ५७,१७,६८,५५४.९५ | (-)१.२४% | ५७,१७,६८,५५४.९५ | (-)१.२४% |

प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या बैठकीत निविदाकाराचे देकार सादर करण्यात आले. निविदा समितीने लघुत्तम निविदाकारास बोलवून वाढीव रक्कम कमी करण्याची विनंती केली. सदर विनंतीस अनुसरुन वाढीव रक्कम असलेल्या तीन निविदाकाराने निविदा रक्कमेस काम करण्याची लेखी आश्वासन दिले, त्यानुसार निविदा किंमत वस्तु व सेवा कर वगळून खालीलप्रमाणे आहे.

| भाग | निविदाकार | सादर आर्थिक देकार (₹) | प्रोव्हीजीनल सम (₹) | रॉयल्टी (₹) | एकूण (₹) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे. अश्विनी इन्फ्रा डेव्हलपमेंट प्रा. लि | ६३,४२,४८,०९४ | ५,५३,५७,१४२ | २१,१७,९५४ | ६९,१७,२३,१९० | निविदा रक्कमेचा दर |
| २ | मे. आरपीएस इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि | ४७,३५,८३,२६१ | ४,७७,७५,३७४ | ४१,७०,४७६ | ५२,५५,२९,१११ | निविदा रक्कमेचा दर |
| ३ | मे. बिटकॉन इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स प्रा. लि | ४६,५७,५२,८०३.०३ | ५,०३,८०,७०४ | १,४५,८५,०७५ | ५३,०७,१८,५८२ | -०.९५% |
| ४ | मे. ईगल इन्फ्रा इंडिया लि . | ४९,६८,२०,९२७ | ३,०८,५१,४१० | ८७,३९,९५६ | ५३,६४,१२,२९३ | निविदा रक्कमेचा दर |
| ५ | मे. आरई इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड | ५७,१७,६८,५५४.९५ | ५,८२,६५,४४१ | ३७,०६,९०९.५२ | ६३,३७,४०,९०६ | -१.२४% |

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १४३४:**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या भाग – १,२,३,४ ते भाग– ५ करीता किंमतीचे देकार, वस्तु व सेवा कराच्या किंवा इतर करांच्या दरामध्ये निविदा प्राप्त होण्याच्या दिनांकापासून आतापर्यंत झालेले बदल व कंत्राटीय कालावधीत आणखी बदल झाल्यास कंत्राटीय तरतुदीनुसार कंत्राटीय किंमतीमध्ये वेळोवेळी योग्य ते समायोजन करण्याच्या अधीन राहून, स्विकारण्यास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे:-

| भाग | निविदाकार | सादर आर्थिक देकार (GST वगळुन) (₹) | प्रोव्हीजीनल सम (₹) | रॉयल्टी (₹) | एकूण (₹) |
|---|---|---|---|---|---|
| १. | मे. अश्विनी इन्फ्राडेव्हलपमेंट प्रा. लि | ६३,४२,४८,०९४ | ५,५३,५७,१४२ | २१,१७,९५४ | ६९,१७,२३,१९० (निविदा रक्कमेचा दर ) |
| २. | मे. आरपीएस इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि | ४७,३५,८३,२६१ | ४,७७,७५,३७४ | ४१,७०,४७६ | ५२,५५,२९,१११ (निविदा रक्कमेचा दर ) |
| ३. | मे. बिटकॉन इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स प्रा. लि | ४६,५७,५२,८०३ | ५,०३,८०,७०४ | १,४५,८५,०७५ | ५३,०७,१८,५८२ -(०.९५%) |
| ४. | मे. ईगल इन्फ्रा इंडिया लि . | ४९,६८,२०,९२७ | ३,०८,५१,४१० | ८७,३९,९५६ | ५३,६४,१२,२९३ (निविदा रक्कमेचा दर ) |
| ५. | मे. आरई इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड | ५७,१७,६८,५५४ | ५,८२,६५,४४१ | ३७,०६,९०९.५२ | ६३,३७,४०,९०६ (-१.२४%) |

**(वरील किंमती वस्तु व सेवा कर वगळून आहेत).**

**"असाही ठराव करण्यात येत आहे की**, या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे."

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यकती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ७: विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत कल्याण विकास केंद्र प्रकल्पातील उसरघर-निळजे-घेसर-कोळे-हेदुटणे, हेदुटणे-माणगांव-भोपर आणि उसरघर- घारीवली या गावांना जोडणाऱ्या चार रस्त्यांच्या कामाकरिता कंत्राटदार नेमणुकीकरिता मान्यता मिळणेबाबत**

७.१ सदर प्रसतावाबाबत महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, राज्य सरकारने ठाणे जिल्हयातील कल्याण येथील २७ गावांचा कल्याण विकास आराखडा मंजूर केला असून त्यापैकी कल्याण विकास केंद्रामध्ये भोपर, संदप, उसरघर. घारीवली, माणगाव, हेदुटणे, कोळे, काटई, निळजे आणि घेसर या १० गावांसाठी अंदाजे ३१४ हेक्टर जागेवर नगररचना घोषित केली आहे. सदर प्रस्तावित विकास केंद्रामधील २७ गावांच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी अपेक्षित असलेल्या अंदाजे ₹१०८९ कोटी खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दि. २६ ऑगस्ट, २०१५ रोजी प्राधिकरणाच्या १३८ व्या बैठकीमधील ठराव क्र. १३४० नुसार देण्यात आली आहे. प्रस्तावित कल्याण विकास केंद्रांतर्गत नवीन चार डीपी रस्त्यांच्या बांधकामाचा समावेश करण्यात आला आहे. प्रस्तावित डीपी रस्त्यांसाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे.

७.२ प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या सल्लागारांनी कल्याण विकास केंद्रामधील प्रस्तावित ४ रस्त्यांचा तपशीलवार अहवाल तयार करुन सदर कामाच्या रु.३६४.७० कोटी किंमतीच्या रस्त्यांच्या कामाची विभागणी भाग- १ ते ३ मध्ये करुन दि. १८/०८/२०२२ रोजी मागविण्यात आल्या. तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| **अ. क्र.** | **कामाचे नाव** | **लांबी (कि.मी.)** | **अंदाजित खर्च (वस्तू व सेवा कर वगळून)(रु.कोटी)** |
|---|---|---|---|
| **भाग -१** | | | |
| १ | उसरघर- निळजे-घेसर या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे | ४.७५ | १०७.१४ |
| **भाग - २** | | | |
| **१** | निळजे- कोळे- हेदूटणे या रस्त्याचे कॉक्रिटीकरण करणे. | ३.३३ | १२३.४९ |
| **२** | उसरघर- घारीवली या रस्त्याचे कॉक्रिटीकरण करणे. | १.४७ | |
| **भाग-३** | | | |
| **१** | हेदूटणे - माणगाव – भोपर या रस्त्याचे कॉक्रिटीकरण करणे. | ४.२६ | ९५.९९ |
| | **एकूण( १+२+३)** | | **३६४.७०** |

७.३ प्राधिकरणाने सदर कामाकरीता दि. १७/०८/२०२२ रोजीच्या वृत्तपत्रामध्ये निविदा प्रसिद्ध केल्या व प्राधिकरणाच्या ई- निविदा पोर्टलवर दि. ०६/१०/२०२२ रोजी निविदा सादर केल्या.

| | **निविदाकारांचे तपशिल** | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **भाग-१** | **भाग-२** | **भाग -३** |
| १ | मे. आर.पी.एस. इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. | मे. इगल इन्फ्रा इंडिया लि. | मे.आर.पी.एस.इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. |
| २ | मे. आर.के. माधानी आणि कंपनी. | मे. बिटकॉन इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स प्रा.लि. | मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. |
| ३ | मे. इगल इन्फ्रा इंडिया लि. | मे. आर.के. माधानी आणि कंपनी. | मे. एन.ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. |
| ४ | --- | मे. एन.ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. | ---- |

सल्लागाराद्वारे तांत्रिक मूल्यमापन अहवाल निविदा मूल्यांकन समितीच्या बैठकीत (Tender Recommendation Committee) सादर करण्यात आले तसेच निविदा समितीला अवगत करण्यात आले की, एका कंत्राटादारास एकच काम या तत्वावर आर्थिक देकार उघडण्यात येणार आहेत. यास निविदा मुल्यांकन समितीने सहमती दर्शविल्यानंतर वरील निविदाकारांचे आर्थिक देकार (Financial offers) उघडण्यात आले.

७.४ खालील तक्त्यात लघुत्तम निविदाकाराची बोली निविदा रक्कमेच्या २ ते ३.३३ % वाढीव दराने आढळली. तपशील खालीलप्रमाणे:-

| **भाग (PKG NO.)** | **लघुत्तम निविदाकार** | **सादर आर्थिक देकार (प्रोव्हीजीनल सम +रॉयल्टी वजा करुन) (₹)** | **वाढीव दर (टक्केवारीमध्ये)** |
|---|---|---|---|
| १. | मे. आर.के. माधानी आणि कंपनी. | ९८,०१,२६,७९४/- | २.९% |
| २. | मे. एन.ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. | ११४,०९,२०,१६०/- | ३.३३% |
| ३. | मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. | ८७,३९,४४,०५६/- | २.७९% |

प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या बैठकीत निविदाकारांचे देकार सादर करण्यात आले. निविदा समितीने लघुत्तम निविदाकारास बोलावून वाढीव रक्कम कमी करण्याची विनंती केली. सदर विनंतीस अनुसरुन तीनही कंत्राटदारांनी निविदा रक्कमेस काम करण्याचे लेखी आश्वासन दिले. त्यानुसार नवीन निविदा किंमत वस्तू व सेवाकर वगळून खालीलप्रमाणे आहे:

| **भाग (PKG NO.)** | **लघुत्तम निविदाकार** | **सादर आर्थिक देकार (प्रोव्हीजीनल सम +रॉयल्टी वजा करुन) (₹)** | **वाटाघाटी करुन आलेला आर्थिक देकार (प्रोव्हीजीनल सम +रॉयल्टी वजा करुन) (₹)** | **प्रोव्हीजीनल सम +रॉयल्टीची अंदाजित रक्कम (₹)** | **वाटाघाटी करुन आलेला आर्थिक देकार (प्रोव्हीजीनल सम +रॉयल्टी सहीत) (₹)** |
|---|---|---|---|---|---|
| १. | मे. आर.के. माधानी आणि कंपनी. | ९८,०१,२६,७९४/- | ९५,२५,०४,१७३/- | ११,८८,०९,३६८/- | १०७,१३,१३,५४१/- |
| २. | मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. | ११४,०९,२०,१६०/- | ११०,४१,५१,९०३/- | १३,०७,६४,५६७/- | १२३,४९,१६,४७०/- |
| ३. | मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. | ८७,३९,४४,०५६/- | ८५,०२,२२,८३९/- | १०,९६,६३,५७७/- | ९५,९८,८६,४१६/- |

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १४३५:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत कल्याण विकास केंद्राच्या चार रस्त्यांच्या कामाकरीता निविदा देकार, वस्तु व सेवा कराच्या किंवा इतर करांच्या दरामध्ये निविदा प्राप्त होण्याच्या दिनांकापासून आतापर्यंत झालेले बदल व कंत्राटीय कालावधीत आणखी बदल झाल्यास कंत्राटीय तरतुदीनुसार कंत्राटीय किंमतीमध्ये वेळोवेळी योग्य ते समायोजन करण्याच्या अधीन राहून, स्विकारण्यास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

| **भाग (PKG NO.)** | **लघुत्तम निविदाकार** | **वाटाघाटी करुन आलेला आर्थिक देकार (प्रोव्हीजीनल सम +रॉयल्टी वजा करुन) (₹)** | **वाटाघाटी करुन आलेला आर्थिक देकार (प्रोव्हीजीनल सम +रॉयल्टी सहीत) (₹)** |
|---|---|---|---|
| १. | मे. आर.के. माधानी आणि कंपनी. | ९५,२५,०४,१७३/- | १०७,१३,१३,५४१/- |
| २. | मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. | ११०,४१,५१,९०३/- | १२३,४९,१६,४७०/- |
| ३. | मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. | ८५,०२,२२,८३९/- | ९५,९८,८६,४१६/- |

**(वरील किंमती वस्तु व सेवाकर वगळून आहेत)**

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे."

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** "वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र. ८:</u>** **<u>मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरीन ड्राईव्ह येथून सागरी किनारा मार्गापर्यंत वाहतूकीच्या दळणवळणासाठी भुयारी मार्गाचे बांधकाम करण्याच्या कामासाठी शक्याशक्यता अहवाल तयार करण्यासाठी तसेच सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार आणि कंत्राटदाराच्या नेमणूकीसाठी विहित निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी सल्लागाराची नेमणूक करण्याबाबत.</u>**

८.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई बेट शहरातील पूर्व मुक्त मार्ग ते मरिन ड्रॉईव्ह येथून सागरी किनारा मार्गापर्यंत वाहतुकीच्या दळणवळणासाठी उन्नत अथवा भुयारी मार्गाचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे. प्रकल्पाची लांबी सुमारे ३.५ कि.मी. इतकी आहे. एकंदरीत भविष्यातील वाहनांच्या संख्येस अनुसरुन १+१ अथवा २+२ मार्गिकांचा मार्ग बांधण्याचे प्रस्तावित आहे. सदरच्या प्रकल्पाची प्रस्तावित आखणी पूर्व मुक्त मार्गापासून सुरु होते व सरदार वल्लभभाई पटेल या रस्त्यावरुन हार्बर व मध्य रेल्वेमार्ग ओलांडून, तसेच इतर रस्ते ओलांडून सागरी किनारा मार्गाशी जोडणे अशी प्रस्तावित आहे. हा प्रकल्प (CTS) Comprehensive Transport Study चा भाग नाही. महानगर आयुक्त यांनी सदरच्या प्रकल्पाच्या समजुतीचा मार्गरेषा दर्शविणा-या नकाशाव्दारे समितीस अवगत केले. महानगर आयुक्त यांनी या प्रस्तावित कामासाठी “मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरिन ड्रॉईव्ह येथून सागरी किनारा मार्गापर्यंत वाहतुकीच्या दळणवळणासाठी उन्नत/ भुयारी मार्गाचे बांधकाम” या प्रकल्पाची शक्याशक्यता तपासण्यासाठी (feasibility study) व सविस्तर प्रकल्प अहवाल बनविणे (DPR) व कंत्राटदाराच्या नेमणूकीसाठी निविदा प्रक्रिया करणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारासाठी निविदा प्रक्रिया करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी निविदा मागविण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मा. मुख्यमंत्री तथा अध्यक्ष, प्राधिकरण यांचेकडून दिनांक २६ जुलै, २०२२ रोजीच्या टिप्पणी अन्वये प्राप्त झाल्याचे नमुद केले.

८.२ सल्लागाराच्या कामाच्या वावामध्ये सदर प्रकल्पाच्या आखणीमध्ये भुयारी मार्ग करण्याकरीता शक्याशक्यता अभ्यास (feasibility study) करून तांत्रिकदृष्टया सुसाध्य मार्गाची आखणी करणे प्रस्तावित आहे. तसेच सल्लागाराने वाहतूक

विनियमासाठी यापूर्वी केलेल्या प्रकल्प अहवालांचा अभ्यास करून, विविध प्रकारच्या सेवावाहिन्यांची माहिती घेऊन, प्रस्तावित प्रकल्पामुळे बाधित होणा-या बांधकामांची व प्रकल्पबाधितांचे सर्वेक्षण करुन, प्रकल्पासाठी प्रत्यक्ष लागणा-या जमिनीचे हस्तांतरण करण्याबाबत आवश्यक ती प्रक्रिया राबवून, हेरिटेज इमारतीची माहिती घेऊन, संबंधित शासकीय, निमशासकीय, महापालिका तसेच खाजगी आस्थापनांशी समन्वय साधून तांत्रिकदृष्टया सुयोग्य अशा पर्यायांची आखणी निश्चित करुन प्राधिकरणास अहवाल सादर करणे अपेक्षित आहे. तद्नंतर, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन प्रकल्पाचे बांधकाम करण्याकरीता कंत्राटदाराच्या नियुक्तीसाठी विहित प्रक्रियेने निविदा प्रक्रिया करण्याच्या कामाचा अंतर्भाव आहे.

८.३ ई- निविदा प्रपत्रे दि. १३ ऑगस्ट, २०२२ रोजी प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली होती. सदरच्या कामाची निविदापूर्व बैठक दि. २३ ऑगस्ट, २०२२ रोजी घेण्यात आली.

८.४ विहित मुदतीत म्हणजेच निविदा स्विकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत (२० सप्टेंबर, २०२२) रोजी सल्लागाराच्या नियुक्तीसाठीची ई- निविदाकारांकडून निविदा प्रपत्रे प्राप्त झाली.

८.५ तांत्रिक निविदा प्रपत्रांची छाननी करुन गठित केलेल्या निविदा शिफारस समितीच्या दि. ७ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या बैठकीत सदस्यांना सविस्तर माहिती देऊन त्याबाबत अवगत करण्यात आले. सदर बैठकीत सल्लागारांच्या तांत्रिक प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व प्राप्त गुणांकन सादर करण्यात आले. प्राप्त गुणांकन खालीलप्रमाणे:

| **अ.क्र.** | **निविदाकाराचे नाव** | **प्राप्त गुण** (१०० पैकी) |
|---|---|---|
| १ | मे. बिवर इन्फ्रा कन्सल्टंट प्रा. लि. | ८०.८० |
| २ | मे. पडॅको कंपनी लि. | ८४.४० |

निविदेतील तरतुदीनुसार तांत्रिक गुणांकन ७५ या गुणसंख्येपेक्षा अधिक असल्याने दोन्ही सल्लागार संस्था तांत्रिक पात्र ठरल्याचे समितीस आढळून आले व त्यानुसार निविदा शिफारस समितीने दोन्ही सल्लागार संस्थांचे **लिफाफा- क** – आर्थिक देकार उघडण्यास मान्यता दिली.

८.६ महानगर आयुक्तांनी असे विषद केले की, निविदा शिफारस समितीची दुसरी बैठक दि. १० ऑक्टोंबर, २०२२ रोजी झाली व त्यात दोन्ही पात्र सल्लागारांचे आर्थिक देकार असणारे लिफाफे उघडून एकत्रित (तांत्रिक व आर्थिक) छाननी प्रस्तावांची सविस्तर चर्चा झाली. त्यामध्ये छाननी केलेले एकत्रित गुणांकन खालीलप्रमाणे:

**एकत्रित गुणांकन तक्ता:**

| **विवरण** | **एकूण गुण** | **प्राप्त गुण** | |
|---|---|---|---|
| | | **मे. बिवर इन्फ्रा कन्सल्टंट प्रा. लि.** | **मे. पडॅको कंपनी लि. जपान** |
| १. तांत्रिक गुण | १०० | ८०.८० | ८४.४० |
| २. आर्थिक बोली (₹) | | १०,७२,८८,७५०/- | ९,०९,७९,०००/- |
| ३. आर्थिक गुण | १०० | ८४.८० | १००.०० |
| ०.८० X तांत्रिक गुण | | ६४.६४ | ६७.५२ |
| ०.२० X आर्थिक गुण | | १६.९६ | २०.०० |
| ४. एकत्रित तांत्रिक व आर्थिक गुणांकन | | ८१.६० | ८७.५२ |
| | | | **सर्वोच्च एकत्रित गुण** |

निविदा शिफारस समितीच्या दुस-या बैठकीत मे. पडॅको कंपनी लि., जपान यांनी प्राप्त केलेले सर्वोच्च एकत्रित गुण आणि त्यांची ₹ ९,०९,७९,०००/- + जी. एस. टी. इतक्या किमतीची आर्थिक बोली स्वीकृत करुन सदर प्रस्तावास सक्षम स्तरावर मंजुरी घेण्याबाबत शिफारस केली.

सदरच्या निविदेची आर्थिक बोली ५ कोटी किंमतीपेक्षा अधिक असल्यामुळे कार्यकारी समितीच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्र. १४३६:</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्यास सहाय्यभूत होणाया इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे, मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरिन ड्रॉईव्ह येथून सागरी किनारा मार्गापर्यंत वाहतुकीच्या दळणवळणासाठी भुयारी मार्गाचे बांधकाम" करण्याच्या कामासाठी शक्याशक्यता अहवाल तयार करण्यासाठी तसेच सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार आणि कंत्राटदाराच्या नेमणूकीसाठी विहित निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे. पडॅको कंपनी लि. जपान यांची ९,०९,७९,०००/- + जी. एस. टी. इतक्या किमतीची आर्थिक बोली स्विकृत करुन नेमणूक करण्यासाठीच्या प्रस्तावास मान्यता दिली.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याकरीता आवश्यक ती सर्व पुढील कार्यवाही करण्याकरीता महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र. ९:</u> <u>मेट्रो मार्ग-२ब च्या मंडाळे येथील मेट्रो कारशेडसाठी प्रीइंजिनिअरिंग स्टिल बिल्डींगचे संकल्पचित्र, फेब्रिकेशन पुरवठा व उभारणीचे काम करणे याबाबत मागविलेले ई-निविदांना मंजुरी देणेबाबत.</u>**

९.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दि. १७ मार्च २०१६ रोजी झालेल्या १३९ व्या बैठकीत तसेच २५ ऑक्टोंबर २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मेट्रो मार्ग २ब डि.एन. नगर - मंडाळे या उन्नत मेट्रो मार्गाची उभारणी करणे या प्रकल्पासाठी रु. १०,९८६/- कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यास मान्यता दिली आहे. मेट्रो मार्ग २ब प्रकल्पासाठी साधारण सल्लागार म्हणून मे. आयका कॉन्सॉरटीयम (AICA Consortium) यांची दिनांक ०५ ऑक्टोंबर, २०१६ रोजी नेमणूक करण्यात आली.

९.२ मेट्रो मार्ग-२ब मंडाळे डेपोच्या प्रीइंजिनिअरींग बिल्डींगच्या कामाकरीता (सीए- १४१) ई-निविदा दि. १० जून, २०२२ रोजी मागविण्यात आल्या. या कामाचा लिफाफा ‘अ’ दि. १५/०७/२०२२ रोजी व लिफाफा ‘ब’ दि. १९/०७/२०२२ रोजी निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आला. या निविदा प्रक्रियेत ९ निविदाकारांनी ई-निविदा सादर केल्या. प्राप्त ई-निविदांच्या पात्रतेची तांत्रिक छाननी मेट्रो मार्ग-२ब प्रकल्पाचे सल्लागार मे. आयका कॉन्सॉरटीयम (AICA Consortium) करण्यात आली व सदर छाननीचा अहवाल प्राधिकरणास सादर केला. निविदाकारांचा पात्र/अपात्रतेचा अहवाल/तपशिल खालीलप्रमाणे आहे: -

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | पात्रता |
|---|---|---|
| १. | मे. अहुलवालिया कॉन्ट्रक्स (इं) लि. | पात्र |
| २. | मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. | अपात्र |
| ३. | मे. ईगल इन्फ्रा इंडिया लि. | अपात्र |
| ४. | मे. दास ऑफशोर लि. | पात्र |
| ५. | मे. एम आणि बी इंजिनिअरींग लि. | अपात्र |
| ६. | मे. एमपीआयएल स्टिल स्ट्रक्चर्स लि. | अपात्र |
| ७. | मे. जमील स्टील बिल्डिंग इंडिया प्रा.लि. | पात्र |
| ८. | मे. पायोनिर फॅब्रिकेटर्स प्रा.लि. | पात्र |
| ९. | मे. एसएमसी इन्फास्ट्रक्चर्स प्रा.लि. | अपात्र |

अपात्र निविदाकारांबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे: -

१. मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांनी सादर केलेल्या दस्ताऐवजानुसार प्रस्तावित दोन कामांचा आवश्यक अनुभव पात्र होत नसल्याने, निविदा निकष पूर्ण करीत नसल्याचे निष्पन्न झाले. सबब मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली.

२. मे. ईगल इन्फ्रा इंडिया लि. यांनी सादर केलेल्या दस्ताऐवजानुसार निविदा किमान आवश्यक अनुभव पात्रतेचे निकष पुर्ण करीत नसल्याचे निष्पन्न झाले. सबब मे. ईगल इन्फ्रा इंडिया लि. यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली.

३. मे. एमपीआयएल स्टिल स्ट्रक्चर्स लि. यांनी सादर केलेल्या दस्ताऐवजानुसार कामाचा कार्यारंभ आदेश काम केलेल्या विभागाचे प्रमाणपत्र व संबंधित विभागाने देयकाची पडताळणी केली नसल्याचे दिसून येते व सनदी लेखापालाव्दारे प्रमाणित खातेवही सादर केलेले असून, परंतु कामांचे विभाजन

नमुद केलेले नसल्याने निविदा निकष पूर्ण करीत नसल्याचे निष्पन्न झाले. सबब मे. एमपीआयएल स्टिल स्ट्रक्चर्स लि. यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली.

४. मे. एम आणि बी इंजिनिअरींग लि. यांनी सादर केलेल्या दस्ताऐवजानुसार मोठ्या प्रमाणात हरकती दर्शविल्या असून, सदर हरकतीसाठी होणारा बदल त्यांनी भरलेल्या निविदा रक्कमेच्या परिशिष्ठ १३ अ मध्ये पकडलेला नसल्याने, निविदा निकष पूर्ण करीत नसल्याचे निष्पन्न झाले. सबब मे. एम आणि बी इंजिनिअरींग लि. यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली.

९.३ प्राधिकरणाकडे प्राप्त निविदांच्या छाननीसाठी मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाने खालीलप्रमाणे निविदा शिफारस समिती गठीत केली आहे:-

(१) संचालक प्रकल्प, मेट्रो: - अध्यक्ष

(२) अभियांत्रिकी विभागाचे मुख्य अभियंता: - सदस्य

(३) वित्तीय सल्लागार: - सदस्य

(४) सह प्रकल्प संचालक (विधी): - सदस्य

(५) मुख्य अभियंता (सीटी), बृहन्मुंबई महानगरपालिका: - सदस्य

महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, दि. ०५/०८/२०२२ रोजी झालेल्या निविदा शिफारस समीतीच्या बैठकीत वरील पात्र निविदाकारांचा लिफाफा ‘क’ उघडण्यासाठी शिफारस करण्यात आली. त्यानुषंगाने तांत्रिकदृष्टया पात्र निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा ‘क’) दि. १०/०८/२०२२ रोजी उघडण्यात आले. सदर प्रमाणे आर्थिक देकाराची (लिफाफा ‘क’) छाननी मेट्रो मार्ग-२ब प्रकल्पाचे साधारण सल्लागार मे. आयका कॉन्सॉरटीयम (AICA Consortium) यांच्या मार्फत करण्यात आली. सदर छाननीचा अहवाल सल्लागाराने दि. १२/०८/२०२२ रोजी सादर केला. सदर अहवालानुसार निविदाकारांच्या आर्थिक देकारांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे : -

| अ.क्र | निविदाकारांचे नाव | निविदेची रक्कम (१२% वस्तु व सेवा कर) | प्राप्त रक्कम (१२% वस्तु व सेवा कर) | % |
|---|---|---|---|---|
| १. | मे. अहुलवालिया कॉन्ट्रक्स (इं) लि. | ६८,७२,८२,९१७/- | ६८,०४,७८,८१६.०० | ०.९९% कमी |
| २. | मे. दास ऑफशोर लि. | ६८,७२,८२,९१७/- | ७३,६७,६७,२८७.०२ | ०७.२०% अधिक |
| ३. | मे. जमील स्टील बिल्डिंग इंडिया प्रा.लि. | ६८,७२,८२,९१७/- | ७५,०५,८१,६७३.६६ | ०९.२१% अधिक |
| ४. | मे. पायोनिर फॅब्रिकेटर्स प्रा.लि. | ६८,७२,८२,९१७/- | ७७,६६,२९,६९६.२१ | १३.००% अधिक |

महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, निविदा शिफारस समितीच्या दिनांक २२/०८/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत प्रकल्पाचे सल्लागार मे. आयका कॉन्सॉरटीयम (AICA Consortium) यांनी तयार केलेला अहवाल सादर करण्यात आला. सदर अहवालानुसार मंडाळे डेपोच्या प्रीइंजिनिअरीं बिल्डिंगच्या पॅकेज सीए १४१ करीता मे. अहुलवालिया कॉन्ट्रॅक्ट्स (इं) लि. यांचा निविदा किंमतीपेक्षा ०.९९ % कमी दराचा रु. ६८,०४,७८,८१६.०० कोटी (१२% वस्तु व सेवा कर सह) रक्कमेचा देकार हा लघुत्तम देकार म्हणुन मंजुर करण्यात आला. सदर मंजुर करण्यात आलेला देकार खालीलप्रमाणे आहे: -

| कंत्राटदारांचे नाव | निविदेची रक्कम (रु. कोटी) (१२% वस्तु व सेवा कर) | प्राप्त देकार (रु. कोटी) (१२% वस्तु व सेवा कर) | % कमी/अधिक (-/+) |
|---|---|---|---|
| मे. अहुलवालिया कॉन्ट्रक्स (इं) लि. | ६८,७२,८२,९१७/- | ६८,०४,७८,८१६.०० | ०.९९% कमी |

वरील बाबी विचारात घेता लघुत्तम निविदाकाराचा एकुण ०.९९ % कमी दराचा देकार स्विकारार्ह आहे, असे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्र. १४३७:</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे उप कलम (३) चे पोट कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या

..२९/-

अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मेट्रो मार्गिका २ब पॅकेज सीए १४१ साठीच्या मंडाळे येथील कारशेडचे प्रीइंजिनिअरिंग बिल्डींगच्या बांधकामासाठी मे. अहुलवालिया कॉन्ट्रॅक्ट्स (इं) लि. यांनी सादर केलेला रु. ६८,०४,७८,८१६.०० कोटी (१२% वस्तु व सेवा कर सह) रक्कमेचा लघुत्तम देकाराची (०.९९% कमी दराचा) लघुत्तम देकार स्विकारण्यास व त्याअनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटी व शर्तीप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे."

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. १०: मुंबई मेट्रो प्रकल्प मार्गिका २-ब, चेंबूर (स्थानक वगळून) ते मंडाळे (स्थानकासह) मार्गिकेच्या गिट्टी रहित (Ballastless) रेल्वे मार्गाच्या कामासाठी आणि मंडाळे डेपोतील गिट्टीरहित, गिट्टीसह, (Ballasted) व विशेष रेल्वे मार्गाच्या कामासाठी संरचना (डिझाईन), पुरवठा, स्थापना, चाचणी आणि मार्ग कमिशनिंग करणे (खुला करणे) (सी.ए. १२४) या कामाकरीता मागविलेल्या ई-निविदांना मान्यता मिळणेबाबत.**

१०.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी अशी माहिती दिली की, मुंबई मेट्रो प्रकल्प २-ब, चेंबूर (स्थानक वगळून) ते मंडाळे (स्थानकासह) मार्गिकेच्या गिटटीरहित (Ballastless) रेल्वे मार्गाच्या कामासाठी आणि मंडाळे डेपोतील गिटटीरहित, गिटटीसह (Ballasted) व विशेष रेल्वेमार्गाच्या कामासाठी संरचना (डिझाईन), पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कमिशनिंग करणे (खुला करणे) या कामाकरिता ई-निविदा मागविण्यात आल्या. दि. १० ऑगस्ट, २०२२ रोजी दुपारी ३ वाजता ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष लिफाफा- अ (निविदा इसारा किंमत) आणि लिफाफा- ब (तांत्रिक प्रस्ताव) उघडण्यात आल्या. निविदा प्रक्रियेत भाग घेतलेल्या निविदाकारांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

१. मे. आयटीडीसि मेंटेशन इंडिया लि.
२. मे. रेल विकास निगम लि.
३. मे. केइसी - एमरेल (जेव्ही)
४. मे. लार्सन ॲन्ड टुब्रो लि.
५. मे. टेक्समॅको - आयएससी (जेव्ही)

१०.२ याबाबत पुढे अशी चर्चा झाली की, ई-निविदांची तांत्रिक छाननी, प्रकल्पाच्या सर्वसाधारण सल्लागारामार्फत करण्यात आली आणि सदर अहवाल प्राधिकरणास दि. ३० ऑगस्ट, २०२२ रोजी सादर करण्यात आला. सर्व साधारण सल्लागाराने सादर केलेल्या अहवालानुसार निविदाकारांचा पात्र/अपात्रतेचा तपशिल खालीलप्रमाणे: -

| **अ.क्र.** | **निविदाकाराचे नाव** | **पात्र/अपात्र** |
|---|---|---|
| १ | मे. आय टी डी सिमेंटेशन इंडिया लि. | पात्र |
| २ | मे. रेल विकास निगम लि. | पात्र |
| ३ | मे. केइसी - एमरेल (जेव्ही) | पात्र |
| ४ | मे. लार्सन ॲन्ड टुब्रो लि. | पात्र |
| ५ | मे. टेक्समॅको – आयएससी (जेव्ही) | पात्र |

वरील तांत्रिक छाननी अहवाल निविदा शिफारस समितीच्या दि. ०२ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला. संचालक (प्रकल्प) – मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी विभागाच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या निविदा शिफारस समितीमध्ये (१) अभियांत्रिकी प्रमुख, अभियांत्रिकी विभाग (२) वित्तीय सल्लागार (३) सह प्रकल्प संचालक (विधी) (४) मुख्य अभियंता, नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचा समावेश होता. सदर तांत्रिक छाननी अहवालावर विस्तृत चर्चा केल्यानंतर निविदा शिफारस समितीने अहवालास मान्यता दिली.

१०.३ या बाबत पुढे अशी चर्चा झाली की, पॅकेज सी.ए.-१२४ अंतर्गत तांत्रिक दृष्टया पात्र ५ निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा-क – आर्थिक प्रस्ताव) दि. ०७ सप्टेंबर, २०२२ रोजी ई-निविदाकारांच्या प्रतिनिधीं समक्ष उघडण्यात आले. त्यानुसार निविदाकारांचा प्राप्त देकार खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | निविदाकाराचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत (१२% वस्तू व सेवा करासह) | निविदाकाराचा देकार (१८% वस्तू व सेवा करासह) | % अंदाजपत्रकीय किंमतीच्या अधिक/ कमी | स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १/५ | मे. आय टी डी सिमेंटेशन इंडिया लि. | | २६७,९२,९१,१७०/- | २८.७७ % | L४ |
| २/५ | मे. रेल विकास निगम लि. | | २३४,२४,३२,३१७/- | १२.५८ % | L२ |
| **३/५** | **मे. केइसी - एमरेल (जेव्ही)** | | **२२५,४१,०५,२६३/-** | **८.३३ %** | **L१** |
| ४/५ | मे. लार्सन ॲन्ड टुब्रो लि. | २०८,०७,००,६४६/- | २३६,९९,१९,८२९/- | १३.९० % | L३ |
| ५/५ | मे. टेक्समॅको – आयएससी (जेव्ही) | | २७४,२६,३७,८४७/- | ३१.८१ % | L५ |

..३१/-

ई-निविदांची आर्थिक छाननी, मेट्रो २-ब प्रकल्पाचे सर्वसाधारण सल्लागारामार्फत करण्यात आली. सर्वसाधारण सल्लगाराने दि. १० सप्टेंबर, २०२२ रोजी आर्थिक छाननी अहवाल प्राधिकरणास सादर केला. त्यानुसार पॅकेज सी.ए.-१२४ मध्येमे. केइसी - एमरेल (जेव्ही) यांचा ₹ २२५,४१,०५,२६३/-(१८% वस्तू व सेवा करासह) रक्कमेचा लघुत्तम देकार अंदाजपत्रकीय ₹ २०८,०७,००,६४६/- (१२% वस्तू व सेवा करासह) किंमतीपेक्षा ८.३३% जास्त दराचा होता. सर्वसाधारण सल्लागार यांनी सदर निविदाकार हा निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारे व रास्त आहे असे नमूद केले आणि निविदा स्विकारण्याकरिता शिफारस केली.

१०.३ सर्वसाधारण सल्लागार यांनी सादर केलेला आर्थिक छाननी अहवाल निविदा शिफारस समिती समोर मान्यतेसाठी दि. १५ सप्टेंबर, २०२२ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत सादर करण्यात आला. सदर आर्थिक छाननी अहवालावर विस्तृत चर्चेअंती, निविदा शिफारस समितीने सर्वसाधारण सल्लागार यांना सर्व निविदाकारांच्या सर्व बाबींच्या देकारांचा तुलनात्मक अहवाल समितीच्या पुढील बैठकीत सादर करण्यास सांगितले. तसेच, मे. केइसी - एमरेल (जेव्ही) यांना त्यांच्या अधिकच्या देकारासाठी स्पष्टीकरण देण्यास सांगितले व समितीच्या दि. १९ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या बैठकीस वाटाघाटीसाठी उपस्थित राहण्यास सांगितले.

१०.४ मे. केइसी - एमरेल (जेव्ही) यांनी त्यांच्या अधिकच्या देकारासाठी दि. १६ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये स्पष्टीकरण सादर केले. तसेच सर्वसाधारण सल्लागार यांनी सर्व निविदाकारांच्या सर्व बाबींच्या देकारांचा तुलनात्मक अहवाल निविदा शिफारस समितीच्या दि. १९ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या बैठकीत सादर केला. समितीने तुलनात्मक अहवालावर विस्तृत चर्चा केली. निविदा शिफारस समितीच्या दि. १९ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या बैठकीत मे. केइसी - एमरेल (जेव्ही) यांनी सांगितले की, त्यांचा देकार हा वस्तू व सेवाकर १८% दरासह आहे. त्यांचा ₹ १९१,०२,५८,६९८/- (वस्तू व सेवाकर वगळून) चा देकार हा अंदाज पत्रकीय किंमत ₹ १८५,७७,६८,४३४/- (वस्तू व सेवाकर वगळून) पेक्षा फक्त २.८३% अधिकचा आहे. मे. केइसी - एमरेल (जेव्ही) यांनी असेही सांगितले की, आगाऊ उचल रक्कमेवर भरावे लागणारे व्याज, विदेशी चलनातील चढ-उतार, मुंबईमधे कामासाठी लागणारे कुशल कामगारांवरील खर्च आणि कंपनी ओव्हरहेड अशा कारणांमुळे त्यांचा देकार हा अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा अधिकचा आहे. विस्तृत चर्चेअंती, मे. केइसी - एमरेल (जेव्ही) यांनी त्यांचा ₹ २२५,४१,०५,२६३/- (१८% वस्तू व सेवा करासह) देकारावर ०.१% सूट देण्याचे मान्य केले.

त्यानुसार मे. केइसी - एमरेल (जेव्ही) यांनीदि. २१ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये ₹ २२,४६,७४६/- (१८% वस्तू व सेवा करासह) सूट दिली आहे. निविदा शिफारस समितीने मे. केइसी - एमरेल (जेव्ही) यांचा ₹ २२५,१८,५८,५१७/-(१८% वस्तू व सेवाकर आणि ₹२२,४६,७४६/- **सूट**सह) अंदाजपत्रकातील ₹ २०८,०७,००,६४६/- (१२% वस्तू व सेवा करासह) किंमतीपेक्षा ८.२३% ने अधिक रक्कमेचा लघुत्तम देकार स्विकारण्यास शिफारस केली.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्र. १४३८:</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे पॅकेज सी.ए.-१२४ साठी **मे. केइसी - एमरेल (जेव्ही)** यांचा रु.२२५,१८,५८,५१७/- (१८% वस्तू व सेवा करासह) अंदाज पत्रकातील रु. २०८,०७,००,६४६/- (१२% वस्तू व सेवा करासह) किंमती पेक्षा ८.२३% ने अधिक रकमेचा देकार स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे."

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यकती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि. प्राधिकरण यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ११: मेट्रो मार्ग-२अ दहिसर पूर्व ते अंधेरी पश्चिम या मेट्रो मार्गाकरीता दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांना Deposit Work on Cost Plus Pecentage या तत्वावर प्रकल्प अंमलबजावणी करण्यात येत असून कंत्राटाच्या रक्कमेत वाढ करणेबाबत.**

११.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी सादरीकरण केले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २८ मे, २००४ रोजी झालेल्या ११० व्या बैठकीत दिल्ली मेट्रो रेल महामंडळ मर्यादित (DMRC) यांनी तयार केलेल्या मुंबई मेट्रो मार्गाच्या बृहत आराखडयास आणि त्यांच्या अंमलबजावणीच्या टप्प्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार सदर बृहत आराखडयात एकूण ९ मेट्रो मार्ग असून त्यांची एकूण लांबी १४६.५० कि.मी. होती. सदरहू काम सन २०२१ पर्यत पूर्ण करणे अपेक्षित होते. सदर आराखडयातील मार्गाचे अंमलबजावणी धोरण निश्चित करतेवेळी व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करताना त्यात काही बदल करण्यात आले. एकूण ३३७.१० कि.मी. लांबीच्या मेट्रो मार्ग बृहत आराखडयास शासनाने मान्यता दिली आहे. महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. एमआरडी-३३१५/प्र.क्र.११३/नवि-७ दिनांक १७.१०.२०१५ प्रमाणे मेट्रो मार्ग २ दहिसर (पूर्व) - चारकोप- वांद्रे- मानखुर्द मेट्रो मार्गाचा टप्पा - १ दहिसर (पू.) - डी.एन. नगर यास अंमलबजावणीसाठी मान्यता दिली असून सदर प्रकल्पास "**निकडीचा सार्वजनिक प्रकल्प**" व "**महत्वपूर्ण नागरी परिवहन प्रकल्प**" म्हणून घोषित केलेले आहे.

११.२ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १३८ व्या बैठकीत ११८ कि.मी. लांबीच्या उन्नत मेट्रो मार्गाच्या आराखडयास मान्यता दिलेली आहे. तसेच प्राधिकरण २४६ व्या बैठकीत मे. DMRC यांना Work on Cost Plus Percentage या तत्वावर प्रकल्पाचा एकूण पूर्णत्वाचा खर्च ₹ ५५६६.२२ कोटी इतक्या किमंतीच्या (सर्व करासहित आणि जमीन खर्च, आराखडयाच्या खर्चासहीत सामान्य खर्च, पुनर्वसन व पुनर्वसाहत इ. यांचा खर्च वगळून, ६% म्हणजेच रु. ३३३.९७ कोटी + वस्तू व सेवा कर इतक्या किमंतीवर देण्यास मान्यता दिलेली आहे.

मेट्रो मार्ग २ अ या प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत: -

| **प्रकल्पाचे नाव**: - मेट्रो मार्ग – २ अ दहिसर(पूर्व) – डि. एन. नगर | |
|---|---|
| मार्गाची लांबी | १८.६० कि.मी. (उन्नत) |
| एकूण स्थानके | १७ (सर्व उन्नत) |
| स्थानके | दहिसर मेट्रो (पूर्व), २) अप्पर दहिसर, ३) कांदरपाडा, ४) मंडपेश्वर, ५) एक्सर, ६) बोरिवली (प), ७) पहाडी एक्सर, ८) कांदिवली (प), ९) डहाणूकरवाडी, १०) वळनई, ११) मालाड (प), १२) लोअर मालाड, १३) पहाडी गोरेगाव, १४) गोरेगाव (प), १५) ओशिवरा, १६) लोअर ओशिवरा, १७) अंधेरी (प.) |
| उन्नत/ भूयारी मार्ग | उन्नत |
| देखभाल दुरुस्ती डेपो | चारकोप (मालवणी) |
| स्थानके जोडणी | डि. एन. नगर (मेट्रो मार्ग १)<br>दहिसर (मेट्रो मार्ग ७- (अंधेरी (पूर्व)- दहिसर (पूर्व) मार्गिका)<br>शास्त्री नगर (मेट्रो मार्ग- ६) |
| प्रकल्प पूर्णत्वाची किंमत | रु. ६४१० कोटी (राज्य शासनाचे कर आणि प्रतिवर्षी ७.५% वाढीसहित) |
| प्रकल्प पूर्णत्वाचा विहीत कालावधी (३.५ वर्ष) | माहे एप्रिल - २०१९ |
| सुधारीत पूर्णत्वाचा दिनांक | डिसेंबर, २०२२ |

मुंबई मेट्रो मार्गिका २अ ही दहिसर (पूर्व) ते डी. एन. नगर पर्यंत नियोजित आहे. या मार्गिकेमध्ये १८.६० कि.मी. लांबीचा उन्नत मेट्रो मार्गिका आणि १७ स्थानके आहेत. सदर मार्गिकेकरिता चारकोप येथे मेट्रो कारशेड असून कार्यरत आहे.

प्राधिकरणाने मे. DMRC यांना Deposit work on cost plus percentage या तत्वावर प्रकल्प अंमलबजावणीकरिता प्राधिकरणाच्या २४६ व्या बैठकीत मान्यता दिलेली आहे.

मेट्रो मार्ग २अ प्रकल्प कार्यन्वीत करणेसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व मे. DMRC यांच्यामध्ये दि. ११.१२.२०१५ रोजी करारनामा (मूळ) करण्यात आला. सदर करारनाम्यामध्ये प्रकल्पाचे स्थापत्य व प्रणाली असे सर्व कामांचा समावेश आहे. तसेच करारनाम्यामध्ये प्रकल्प पुर्णत्वाची अंदाजित रक्कम रु.५४७० कोटी (सर्व करासहित) त्यावर फी ६% प्रमाणे रु. ३२८.२० कोटी + सर्व कर असे देण्याचे ठरले.

मूळ करारनामा अनुसार प्रकल्प पूर्ण करण्याचा कालावधी ३.५वर्ष माहे मे, २०१९ पर्यंत होता. मेट्रो प्रकल्पामध्ये आर्दश नगर येथील वळण जमीन ताबा व वृक्ष छाटणी परवानगी उशीरा प्राप्त झाल्यामुळे कामास विलंब झाला. यामुळे सल्लागार फी देयकामध्ये मुळ करारनाम्यातील कलम - ११ मध्ये दुरुस्ती अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व मे. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांचे सोबत बैठकीमधील चर्चेनुसार Payment structure re-negotiate करुन बदल करण्याचे ठरले.

सुधारीत करारनामा दि. १६.०१.२०२० रोजी करण्यात आला. यामध्ये सल्लागार फी करारनाम्यातील कलम – ११ मध्ये दुरुस्ती करण्यात आली. सक्षम प्राधिकारी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे मान्यतेनुसार सल्लागार फी मध्ये वाढ न करता मुदतवाढ कालावधी (५.५वर्षे) माहे मे, २०१९ ते एप्रिल, २०२१ पर्यंत वाढविण्यास मान्यता देण्यात आली. मे. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन प्रकल्प अंमलबजावणी सल्लागार यांची एप्रिल, २०२१ पर्यंत ६६ महिने (५.५ वर्ष) महिन्यांची मुदत समाप्त झाली असून, मे. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांनी मुदतवाढ मिळण्याबाबत विनंती केली होती. या अनुषंगाने करारनाम्यातील अटीनुसार प्राधिकरणाद्वारे सक्षम प्राधिकारी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी मे. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांस दि. ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत मुदतवाढ प्रदान करण्यात आली आहे. त्याकरिता सदर मुदतवाढीमुळे कंत्राटाच्या रक्कमेत वाढ प्रस्तावित करीत आहे.

सक्षम प्राधिकारी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे मान्यतेनुसार करारनाम्यातील कलम ११ या अटीनुसार वाढीव मुदतवाढ मे, २०२१ ते मे, २०२२, व जून, २०२२ ते डिसेंबर, २०२२ पर्यंत अनुक्रमे आवश्यकतेनुसार वाढीव रक्कमेसह मुदतवाढ देण्याचे ठरले.

सदर मार्गिकेची **टप्पा - १** (दहिसर-(पूर्व) – डहाणूकरवाडी) ९ कि.मी. लांबी व ९ स्थानके स्थापत्य व प्रणाली कामे पूर्ण करुन दिनांक ०२.०४.२०२२ पासून प्रवासी वाहतूक सुरु आहे. **टप्पा – २** (डहाणूकरवाडी – अंधेरी (पश्चिम) ९.६० कि.मी. लांबी व ८ मेट्रो स्थानके, डिसेंबर, २०२२ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

मे. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांस मेट्रो मार्ग २अ करिता दि. ३१.१२.२०२२ पर्यंत करारनाम्यातील सुधारीत अटीनुसार वाढीव रक्कमेसह मुदतवाढ कार्यालयीन आदेश क्र. MPIU/ML@A/DMRC/३rd Extension/B४/२०२२/९२२ दिनांक १९/०७/२०२२ नुसार देण्यात आलेले आहे. उपरोक्त प्रस्तावित मुदतवाढीच्या कालावधीसाठी (मे, २०२१ ते डिसेंबर, २०२२, २० महिने) मे. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या फी रक्कमेत एकूण ₹ ६९.६२ कोटी रक्कम वाढ होत असून अंदाजे मूळ फीच्या रक्कमेत (₹ ३२८.२० कोटी), २१.२१% वाढ होत आहे.

- सदर प्रकल्पाचे भूमिपूजन मा. पंतप्रधान यांच्या शुभ हस्ते दिनांक ११ ऑक्टोबर, २०१५ रोजी करण्यात आले.
- मे. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांच्याद्वारे ठेव अंशदान कार्यतत्वावर (Deposit Work Basis) सदर प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.
- माहे सप्टेंबर, २०२२ अखेर १००% काम पूर्ण.
- सदर मार्गिकेची टप्पा – १ (दहिसर-(पूर्व) – डहाणूकरवाडी) ९ कि.मी. लांबी व ९ स्थानके स्थापत्य व प्रणाली कामे पूर्ण करुन ०२.०४.२०२२ पासून प्रवासी वाहतूक सुरु आहे.
- टप्पा – २ (डहाणूकरवाडी – अंधेरी (प.) ९.६० कि.मी. लांबी व ८ मेट्रो स्थानके, डिसेंबर, २०२२ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.
- स्थापत्य कामे–३०.०९.२०२२ पर्यंत पूर्ण
- प्रणाली कामे – ३०.०९.२०२२ पर्यंत पूर्ण
- टप्पा – २ प्रवासी वाहतूक सी.एम.आर.एस. यांच्या मान्यतेनंतर डिसेंबर, २०२२ पर्यंत पूर्ण होईल.
- मे. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन प्रकल्प अंमलबजावणी सल्लागार यांची ६६ महिने (५.५ वर्ष) महिन्यांची मुदत समाप्त झाली असून मुदतवाढीचा प्रस्ताव मंजूर झाला आहे. प्राधिकरण याद्वारे मे. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांस ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत मुदतवाढ व त्याकरिता लागणारी रक्कम वाढ प्रस्तावित करीत आहे.

- कोव्हिड – १९ ह्या वैश्विक महामारी रोगाच्या प्रार्दुभावामुळे कामांच्या अंमलबजावणीत सुमारे दीड वर्षाचा अडथळा.
- मे. DMRC यांस मेट्रो मार्ग २अ करिता दि. ३१.१२.२०२२ पर्यंत मुदतवाढ देणे.
- उपरोक्त प्रस्तावित मुदतवाढीच्या कालावधीसाठी (मे, २०२१ ते डिसेंबर, २०२२, २० महिने) मे. DMRC चे फी रक्कमेत एकूण रु.६९.६२ कोटी रक्कम वाढ होत असून अंदाजे मूळ फी च्या रक्कमेत (रु. ३२८.२० कोटी), २१.२१% वाढ होत आहे.
- आदर्शनगर येथील जमीन ताबा मिळण्यास (१२.०६.२०२१) झालेला विलंब.
- टप्पा – १ साठी CMRS मंजूरी दि. २४.०३.२०२२ रोजी प्राप्त, त्यामुळे टप्पा – १ चे महसूल संचालन तारीख (ROD) दि. ०२.०४.२०२२ रोजी सुरु झाले.
- टप्पा – २ चे स्थापत्य व प्रणाली कामे पूर्ण क्षमतेने हाती घेऊन अंतिम टप्प्यात आहेत.
- अशा विविध बाबींचा विचार करता मे. DMRC सल्लागारांच्या मुदतीत वाढ मंजूर झालेली आहे.

मेट्रो मार्ग – २अ दहिसर (पूर्व) ते डि एन. नगर मेट्रो मार्गाकरीता मेसर्स दिल्ली मेट्रो रेल महामंडळ मर्यादित यांच्या सल्लागार कंत्राटाच्या रक्कमेत ₹ ६९,६२,००,०००/- वाढीव कालावधी करिताची फी इतकी वाढीव रक्कम मूळ स्विकृत कंत्राटाच्या ₹.३,२८,२०,००,०००/- इतक्या किंमतीच्या वर २१.२१% इतक्या वाढीस म्हणजे एकूण ₹३,९७,८२,००,०००/- इतक्या रक्कमेस मंजूरी देणे प्रस्तावित आहे. कंत्राटाच्या इतर सर्व कराराच्या अटी व शर्तीत कुठलाही बदल नाही. वरील प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १४३९:**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे: -

मेट्रो मार्ग – २अ दहिसर (पूर्व) ते डि एन. नगर मेट्रो मार्गाकरीता मेसर्स दिल्ली मेट्रो रेल महामंडळ मर्यादित यांच्या सल्लागार कंत्राटाच्या रक्कमेत ₹ ६९,६२,००,०००/- वाढीव कालावधी करिताची फी इतकी वाढीव रक्कम मूळ स्विकृत कंत्राटाच्या ₹३,२८,२०,००,०००/- इतक्या किंमतीच्या वर २१.२१% इतक्या वाढीस म्हणजे एकूण ₹३,९७,८२,००,०००/- इतक्या रक्कमेस मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणाऱ्या आर्थिक बदलांसह अधिदान करण्यास आणि वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र. १२: अ) प्राधिकरणाचे दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

**बाब क्र. १२: ब) प्राधिकरणाचे दिनांक ३० जून, २०२२ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

१२.१ महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३१ मार्च, २०२२ व दिनांक ३० जून, २०२२ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत समितीस माहिती दिली.

१२.२ त्यानंतर प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेखांची नोंद घेऊन लेख्यांस कार्यकारी समितीने मान्यता दिली.

**बाब क्र. १३: प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल: दिनांक ०१ जुलै, २०२२ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०२२**

१३.१ महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक १ जुलै, २०२२ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ दरम्यान केलेल्या गुंतवणूकीची संक्षिप्त माहिती दिली.

१३.२ त्यानंतर कार्यकारी समितीने दिनांक १ जुलै, २०२२ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ पर्यंतच्या गुंतवणूक अहवालाची नोंद घेतली.

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

*******